REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाविलास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ | पुणें, बुधवार, तारीख १७ एप्रिल, १९४० | अंक १६

## " अर्थ " ग्रन्थमालेंतील पुस्तकें

व्यापार, उद्योगधंदे, शेती, सहकार, बँकिंग इत्यादि विषयांवरील सोपीं व व्यावहारिक उपयुक्ततेचीं लोकप्रिय पुस्तकें.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
दुसरी आवृत्ति किं. १ रु. ८ आ.
२ रिझर्व्ह बँक : किं. १ रु.
३ व्यापारी उलाढाली : किं. १ रु.

* * *

१ भारतीय अर्थशास्त्र : किं. ५ रु.
२ अर्थशास्त्र : किं. ३ रु.

अर्थशास्त्र, बँकिंग, सहकार इत्यादि विषयांवरील इतर पुस्तकेंहि पुरविलीं जातील.

अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.

मुंबई प्रान्ताच्या शाळाखात्यानें लायब्ररीसाठी मंजूर केलेलें व असिस्टंट रजिस्ट्रारसाहेब यांनीं शिफारस केलेलें पुस्तक.

## फर्म, कंपनी, सोसायटीचा कायदा

( लेखकः—श्री. के. बा. गजेन्द्रगडकर, बी. ए. ऑनर्स, ) एलएल. बी. वकील.

या पुस्तकांतील कायद्यासंबंधीं विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला धरून आहे. तिकिटरूपानें ८६ पाठवून एक प्रत संग्रही ठेवा.

तसेंच शेतकऱ्यांना ऋणमुक्त करण्यासाठी मुंबई सरकारनें नवीनच पास केलेला

## — शेतकरी ऋणविमोचन कायदा —

मराठी भाषेंत छापत आहे. १ रु. पाठवून नांव नोंदवा. मागाहून किंमत जास्त पडेल. तरी आजच ऑर्डर द्या.

पत्ता मॅनेजर, सेन्ट्रल लॉ हाऊस.
टिळक रोड, नागपूर शहर.

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्कायर,
एम. ए., कॅंटब, बार-ॲट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील ॲंड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
## ग्रेट सोशल लाईफ ॲण्ड जनरल ॲशुरन्स लिमिटेड.
हेड ऑफिस—जळगांव, पू. खा.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. ऽ एजन्सीकरितां आजच लिहा. ऽ

पूर्ण स्वदेशी,
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

# विविध माहिती

### शिक्षणाची प्रगति

हिंदुस्थानांतील शिक्षणाची प्रगति दर्शविणारे १९३२ आणि १९३७ सालाबाबत आकडे खाली दिले आहेत:—

| | १९३२ | १९३७ |
|---|---|---|
| एकूण विद्यार्थी | १ कोटि, २७½ लक्ष | १ कोटि, ४१½ लक्ष |
| शिक्षणावरील खर्च (रु.) | २७ कोटि, १८ लक्ष | २८ कोटि, ५ लक्ष |
| विद्यार्थिनींची संख्या | २४ लक्ष, ९३ ह. | ३१ लक्ष, ३८ ह. |
| विद्यार्थिनींच्या शिक्षणावर खर्च (रु.) | २ कोटि, ३९ लक्ष | २ कोटि, ६९ लक्ष |

| | १९१७ | १९३७ |
|---|---|---|
| विश्वविद्यालयांतील विद्यार्थी | ६१,००० | १,२९,००० |

सहशिक्षणाचा प्रसार होत आहे. मुसलमान विद्यार्थ्यांत मुलींचें प्रमाण वाढत आहे.

### दि न्यू सिटिझन बँक ऑफ इंडिया, लि

वरील बँकेनें १९३९ सालाकरितां ३% आणि १९३८ सालाकरितां १ % असें ५ % क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स भागांवर डिव्हिडंड जाहीर केलें आहे.

### रेल्वेजची खरेदी

हिंदुस्थान सरकारचे पुढील रेल्वेजशी झालेले करार खाली दिलेल्या वेळीं संपुष्टांत येत आहेत. त्यानंतर सरकार त्या रेल्वेज् विकत घेऊं शकेल:—

| | |
|---|---|
| १ दिब्रू-सादिया रेल्वे | ५-२-१९४१ |
| २ शहादारा-सहारणपूर रेल्वे | १८-४-१९४१ |
| ३ आसाम-बंगाल रेल्वे | ३१-१२-१९४१ |
| ४ बी. बी. सी. आय. रेल्वे | ३१-१२-१९४१ |

ह्यांपैकीं पहिली रेल्वे फायदेशीर होण्याचा संभव नसल्यानें ती विकत न घेण्याचें सरकारनें ठरविलें आहे. बाकीच्या रेल्वेजच्या खरेदीसंबंधीं विचार चालू आहे.

### नवीन वैमानिक वहातुक

अमरेळी आणि बडोदें ह्यांस जोडणाऱ्या वैमानिक वहातुकीस घेल्या आठवड्यांत प्रारंभ झाला.

### जादा नफ्यावरील कर

जादा नफ्यावरील कराबाबत कायदा शनिवार, ता. १३ एप्रिल रोजीं अंमलांत आला.

### साखरेचें उत्पादन वाढलें

हिंदुस्थानांत चालू मोसमांत एकूण १२ लक्ष टन साखरेचें उत्पादन होईल, अशी अपेक्षा आहे. गेल्या वर्षी ९ लक्ष, ७१ हजार टन साखरेचें उत्पादन झालें होतें. गेल्या वर्षी १९½ कोटि मण ऊस पुरला होता, यंदा ३५ कोटि मण ऊस साखरेसाठी उपयोगांत आणला जाईल. साखरेचा उतारा ·०१% नें सुधारून तो ९·३०% पडेल अशी अपेक्षा आहे.

### पूना एक्स्पेन्स लि

वरील कंपनीची स्थापना नुकतीच झाली आहे. श्री. डी. व्ही. रामडे, एल. सी. ई. ह्या कंपनीचे पहिले डायरेक्टर आहेत. पुण्यांतील इस्टेटी विकत घेणें आणि त्यांची व्यवस्था पहाणें हा कंपनीचा उद्देश आहे. कंपनीचें भांडवल १,२५,००० रुपये आहे. कचेरीचा पत्ता विष्णुपुरा, रविवार, पुणें २ असा आहे.

### कोळशास मागणी

बी. बी. ॲन्ड सी. आय. रेल्वे कंपनीनें नुकतीच ३ लक्ष, ९१ हजार टन हिंदी कोळशाची खरेदी केली आहे. रेल्वेच्या स्वतःच्या कोळशाच्या खाणी आहेतच. ह्या रेल्वेची एकूण वार्षिक कोळशाची मागणी पुरविण्यासाठी ५,००० मजुरांना वर्षभर खाणींत काम करावें लागेल.

### फिनलंड

फिनलंडचें क्षेत्रफळ इंग्लंड आणि वेल्सच्या तिप्पट आहे. त्यांतील १७ हजार चौरस मैल पाण्याच्या तलावांखालीं आहेत.

### रेल्वे रस्ता

अमेरिकेमध्यें रेल्वे रस्त्यांच्या लांबीचें लोकसंख्येशीं प्रमाण ५३८:१ मैल असें पडते. ग्रेटब्रिटनमध्यें तें २१९८ लोकवस्तीस १ मैल असें आहे.

### ग्रेटब्रिटन आणि रशिया ह्यांमधील वाटाघाटी

ग्रेट ब्रिटन आणि रशिया ह्यांचेमध्यें व्यापारी वाटाघाटी चालू नाहींत, असें मि. बटलर ह्यांनीं कॉमन्स सभेंत सांगितलें.

### रिफॉर्म्स ऑफिस

फेडरेशनच्या आगमनाची पूर्वतयारी करण्यासाठी रिफॉर्म्स ऑफिस उघडण्यांत आलें होतें तें आतां बंद करण्यांत आलें आहे.

### आगबोटी स्थानबद्ध करणार

हिंदी बंदरांतील नॉर्वेजिअन आणि डॅनिश आगबोटी स्थानबद्ध करण्याचें हिंदुस्थान सरकारनें ठरविलें आहे.

### अमेरिकेंतील डॅनिश व नॉर्वेजियन पैसे

अमेरिकेंतील डॅनिश व नॉर्वेजिअन सरकारच्या अगर लोकांच्या मालकीचे पैसे अमेरिकन सरकारच्या खास परवानगीशिवाय हलवतां येणार नाहींत असा प्रेसिडेंट रूझवेल्टनें हुकूम काढला आहे.

### सिंध प्रांतांतील खनिज संपत्ति

सिंधमधील खनिज संपत्तीच्या पहाणीचें काम चालू आहे. जिऑलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियाचे डॉ. शहाणी हे सिंध सरकारच्या विनंतीवरून हें काम करीत आहेत. दगडी कोळसा, रॉकेल, इत्यादि तेथें सांपडण्याचा संभव वाटत आहे.

### सायकलींचा कारखाना

पाटणा येथील सायकलींच्या कारखान्याचें बांधकाम पुरें झालें आहे. मे, १९४० पासून त्यामध्यें दररोज एका पाळीच्या कामानें १५० सायकली तयार होऊं लागतील.

### व्यापारवाढीसाठी ब्रिटिश सरकारचें भांडवल

किस्येक तटस्थ राष्ट्रांशी होणारा व्यापार वाढवण्याच्या हेतूनें इंग्लंडमध्यें एक कंपनी स्थापन करण्यांत आली आहे आणि तिचें सर्व भांडवल ब्रिटिश सरकारनें पुरवण्याचें ठरवलें आहे.

### दररोज सव्वा कोटि रुपयांचा खर्च

शस्त्रास्त्रांचें उत्पादन इंग्लंडमधील लढाऊ सामानाच्या कारखान्यांत झपाट्यानें वाढत असून त्यांत दररोज सव्वा कोटि रुपयांच्यावर खर्च होत आहे.

### धंदा कसा काय आहे?

एक जर्मन व्यापारी दुसऱ्या व्यापाऱ्यास:—आज धंदा कसा काय आहे?

दुसरा व्यापारीः—बरा आहे.

पहिला व्यापारीः—खरें की काय?

दुसरा व्यापारीः—होय. उद्याच्या मानानें आज बरा आहे.

अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | १८२ |
| २ युद्धानें उग्र स्वरूप धारण केलें ... ... | १८३ |
| ३ मुंबई प्रांतांतील सेढी आणि शेती ह्यांची सुधारणा ... | १८४ |
| ४ स्फुट विचार ... | १८५ |
| कृषिक्षेत्रांची बेकारी—बंगालमधील परिस्थिति—बेकारीवर उपाय—दारूबंदीच्या कायदेशीरपणावर हायकोर्टाचा अभिप्राय—जपानी कापडाची हिंदुस्थानांत आयात | |
| ५ औंध स्टेट बँकिंग अँड इं. क. लि. | १८७ |
| ६ ग्रेट ब्रिटनमधील जर्मन लोक ... ... | १८७ |
| ७ आळशीची लागवड | १८८ |
| ८ हाडांचा उपयोग ... | १८९ |
| ९ मि. मॉन्टेग्यू नॉर्मन | १८९ |
| १० निवडक बाजारभाव | १९१ |

अर्थ

बुधवार, ता. १७ एप्रिल, १९४०

## युद्धानें उग्र स्वरूप धारण केलें

हिंवाळा संपतांच युरोपांतील युद्धाचा वणवा भडकणार असें वर्तविण्यांत आलेलें भविष्य खरें ठरलें आहे. गेले सात महिने फ्रान्स व जर्मनी ह्यांच्यामधील अभेद्य तटबंदीच्या समोर किरकोळ गोळंदाजी व चकमकी ह्यांच्यापेक्षां अधिक कांहींच घडूं शकलें नाहीं. समुद्रांत मात्र जहाजें बुडवण्याचा सपाटा जर्मनीनें बेगुमानपणानें चालवला होता. बाहेरच्या देशांतून माल जर्मनीस पोहोंचूं द्यावयाचा नाहीं असें ठरवून इंग्लंडनें शत्रूची नाकेबंदी करून टाकली होती. ती निष्फळ व्हावी म्हणून तटस्थ राष्ट्रांचीं जहाजें बुडवण्याची जबाबदारी इंग्लंडवर टाकण्याचा आणि त्या राष्ट्रांस चिथवण्याचा डाव जर्मनीनें टाकून पाहिला. आपला तटस्थपणा टिकवण्याची नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क इत्यादि राष्ट्रांनीं शिकस्त केली, पण हा केवळ तारेवरचा नाच होता. आपल्या व्यापाराची नाकेबंदी यशस्वी होण्यास त्यांनीं इंग्लंडला अप्रत्यक्ष रीतीनेंहि मान्यता देऊं नये असा जर्मनीचा आग्रह होता. जर्मनीस ज्यानें मदत होणार नाहीं असा तटस्थ राष्ट्रांचा सर्व व्यापार आपण चालू देत आहों, असें इंग्लंडचें म्हणणें होतें. जर्मनीच्या आर्थिक नाकेबंदीचा फास घट्ट करण्याचा प्रयत्न इंग्लंडनें चालू करतांच खऱ्या युद्धास प्रारंभ झाला. इंग्लंड व फ्रान्स ह्या दोन्हीं देशांत भयंकर खर्चाच्या पण रेंगाळणाऱ्या युद्धाचा जनतेस कंटाळा आला होता आणि हिटलर उचल खाण्यापूर्वी दोस्त राष्ट्रांनीं त्यास चांगला हात दाखवावा असा तिनें आग्रह धरला. ब्रिटिश व फ्रेंच सरकारांनीं त्यास अनुसरून चढाईचें धोरण अंगिकारण्याचें ठरवलें. स्कँडेनेव्हियाची एक बाजू आणि बाल्कन्सची दुसरी बाजू ह्या दोन दारांमधून जर्मनीस कांहीं युद्धोपयोगी माल मिळत असे, ते दोन्हीहि मार्ग बंद करून टाकण्याचा इंग्लंडचा निश्चय झाला. त्याप्रमाणें बाल्कन राष्ट्रांचा माल खरेदी करून तो जर्मनीस मिळणार नाहीं अशी व्यवस्था होत आहे. जर्मनीस लोखंडाचा पुरवठा नॉर्वेमधून होतो, तो बंद करण्यासाठी त्या बाजूच्या समुद्रांत इंग्लंडनें पाणसुरुंग पसरले. आतां आपली गळचेपी होणार असें दिसतांच पूर्वींच केलेल्या योजनेप्रमाणें जर्मनीनें नॉर्वेच्या किनाऱ्यावर आपल्या फौजा उतरविल्या आणि डेन्मार्कवर स्वारी केली. डेन्मार्क ह्या चिमुकल्या राष्ट्रास जर्मन सैन्याचा प्रतिकार करणें अर्थातच शक्य झालें नाहीं. नॉर्वेनें मात्र आपल्या स्वातंत्र्यासाठी जर्मनीशीं लढण्याचें ठरवलें आहे. रशिया व इटली ह्या राष्ट्रांकडून सहाय मिळवण्याचा आणि त्यांचा आपल्यासंकट एक बळकट गट बनवण्याचा जर्मनीचा डाव मागेंच फसल्यानें डेन्मार्क, नॉर्वे, स्वीडन इत्यादि तटस्थ देशांवर स्वतःचें वर्चस्व लादून युद्धाचें क्षेत्र त्या बाजूकडे फैलावण्याचा बेत हिटलरनें केला.

आपण तटस्थ वृत्ति कितीहि प्रामाणिक वृत्तीनें आचरणांत आणली तरी स्वतःच्या सोयीसाठी हिटलर शेजारच्या लहान व निरपराधी देशांच्या स्वातंत्र्याचा बळी घेण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं अशी भीति डेन्मार्क, हॉलंड इत्यादि राष्ट्रांस वाटतच होती. डेन्मार्क व नॉर्वे ह्यांचे बाबतींत ती आतां खरी ठरली असून हॉलंड व बेल्जम ह्या देशांत त्या योगानें खळबळ उडाली आहे. हिटलरच्या शब्दांवर विश्वास ठेवणें धोक्याचें असून तटस्थ राष्ट्रांनीं स्वतःच्या संरक्षणाची तजवीज वेळींच करणें आवश्यक असल्याचें मि. चर्चिल ह्यांनीं मागेंच सुचवलें होतें आणि कॉमन्स सभेंत त्या सल्ल्याचा पुनरुच्चार त्यांनीं नुकताच केला. नॉर्वेच्या बाबतींत ब्रिटिश आरमारास थोड्या सवलती वेळींच मिळाल्या असत्या तर आज जर्मन फौजा त्या देशाच्या किनाऱ्यावर दोन प्रमुख ठिकाणीं उतरल्या आहेत, तो प्रसंग टळला असता, असेंहि त्यांनीं सुचवलें. तथापि, ब्रिटनला नॉर्वेच्या सहायार्थ जेवढी जलदी करून जर्मनीचा प्रतिकार करणें शक्य होतें तेवढ्या त्वरेनें ब्रिटिश आरमार व आकाशयानें ह्यांनीं शत्रूस चांगलाच हात दाखवला आहे. इकडे स्कॅपाफ्लोवर विमानी हल्ला चढवून आपल्या फौजा त्याचवेळीं नॉर्वेमध्यें महत्त्वाच्या बंदरांत उतरावयाच्या असा जर्मनीचा डाव होता. पण ब्रिटिश आरमारी बळ किती तरी वरचढ असल्यानें त्यानें जर्मनीचीं अनेक जहाजें डेन्मार्क व नॉर्वे ह्यांच्या किनाऱ्याजवळ बुडवलीं आहेत. गेल्या आठवड्यांतला हा समुद्रावरील संग्राम घनघोर होता, हें त्याचीं वर्णनें प्रसिद्ध झालीं आहेत, त्यांवरून स्पष्ट झालें आहे. मि. चर्चिल ह्यांनीं कॉमन्स सभेंत तपशीलवार माहिती दिली, ती अत्यंत उत्तेजनकारक होती. स्वीडन—नॉर्वे आणि डेन्मार्क ह्यांच्यामधील अरुंद समुद्रांत कॅटेगट व स्कॅगरॅक ह्यांमध्यें ही रणधुमाळी माजली आणि तीमध्यें जर्मनीच्या निरनिराळ्या स्वरूपांच्या अनेक जहाजांस जलसमाधि मिळाली. नॉर्वेच्या दक्षिण व पश्चिम किनाऱ्यांवरहि युद्ध जुंपलें असून जर्मनीची लांडगेतोड ब्रिटिश आरमारानें चालवली आहे.

नॉर्वेवर स्वारी करण्यांत जर्मनीनें युद्धाच्या डावपेचांत घोडचूक केली आहे असें मत व्यक्त करण्यांत येत आहे, त्याचा अर्थ असा आहे कीं, जर्मन लष्करी बळ आतां पांगलें असून इंग्लंड व फ्रान्स ह्यांच्या आरमाराच्या व आकाशयानांच्या तावडींत तें सांपडलें आहे. पोलंड व फिनलंड ह्या देशांत जर्मनीचा व रशियाचा प्रतिकार करण्यास दोस्त राष्ट्रांस आपल्या फौजा पाठवणें अशक्य होतें. नॉर्वेची गोष्ट अशी नाहीं. ह्या देशांत इंग्लंडहून कुमक पाठवणें सोपें असून जर्मन जहाजें व फौजा ह्यांच्याशीं दोन हात करण्याची संधी दोस्त राष्ट्रांस मिळाली आहे. एखाद्या पिसाळलेल्या श्वापदाप्रमाणें नॉर्वेवर झडप घालून

त्याचा हिटलरचा बेत होता आणि त्याप्रमाणें त्या देशांत जर्मन फौज जाऊन दोन-तीन ठिकाणीं उतरली. परंतु ब्रिटिश आरमार व आकाशयानें ह्यांनीं त्वरा करून जर्मन जहाजांचा धुव्वा उडवला आहे आणि नॉर्वेमधील जर्मनीच्या फौजांस कुमक जाण्याचा मार्ग रोखला आहे. स्वीडनमधून सैन्य व सामुग्री नेल्यावांचून जर्मनीस नॉर्वेमध्यें प्रगति करणें दुरापास्त झालें आहे. म्हणजे स्वीडनची तटस्थता नाहींशी करून त्या राष्ट्राचेंहि वैर जर्मनीस संपादन केलें पाहिजे. ह्या रीतीनें लढाईच्या आघाडीचा विस्तार करून हिटलरनें स्वतःची शक्ति विभागली आहे आणि आपल्या अंतिम पराजयाची पूर्वतयारीच केली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. ऑस्लोच्या तीन बाजूंनीं जर्मन सैन्य पुढें जाऊं पहात असतां त्याचा नॉर्वेच्या फौजांनीं प्रतिकार चालवला आहे. नॉर्वे म्हणजे पोलंड नव्हे हा अनुभव हिटलरला थोडक्या अवधींतच येईल.

## मुंबई प्रांतांतील खेडीं आणि शेती यांची सुधारणा

सेड्यांकडे परत जाण्याची घोषणा कॉंग्रेस सरकारनें केली तेव्हांपासून खेडीं व शेती यांच्या सुधारणेची नवीन लाट उसळली. साबरमती आश्रमांत निरनिराळ्या सेड्यांतील ५० उत्साही कार्यकर्त्यांना एक वर्ष शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यांत आली. त्यांच्या शिक्षणक्रमांत शेतीविषयक माहिती, सहकारी चळवळ, ग्रामपंचायत इत्यादि विषयांचा समावेश करण्यांत आला. या शिक्षणाचा फायदा त्यांनीं आपआपल्या खेडेगांवांतील मंडळींस द्यावा हा मुख्य उद्देश होता. या शिक्षण केंद्रांची उपयुक्तता पटल्यावरून १९४०–४१ करितां विद्यमान मुंबई सरकारनें ठाणें जिल्ह्यांतील बोर्डी, धारवाड जिल्ह्यांतील देवी होसर, व खानदेशांतील धुळें या ठिकाणीं नवीन वर्षापासून शिक्षण केंद्रें उघडण्याची योजना आखली आहे. याकरितां दीड लक्ष रुपये रकम मंजूर करण्यांत आली आहे.

१९४०-४१ सालांत सहकारी आणि शेतकी खात्यांना मदत करण्यासाठी ग्रामसुधारणा खातें निर्माण करण्यांत आलें आहे. तसेंच प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाची स्थापना करण्यांत आली आहे.

कॉंग्रेस सरकारनें राजिनामा दिल्यानंतर ग्रामसुधारणा बोर्डें व खेडेगांव सुधारणा कमिट्या आर्थिक अनश्चिततेमुळें बंद करण्यांत आल्या आहेत. वरील कारणामुळेंच प्रांतिक ग्रामसुधारणा बोर्डाची सभाहि अजून बोलावण्यांत आलेली नाहीं.

निरनिराळे प्रयोग करून मुंबई सरकारनें प्रत्यक्ष शेतीला उपयुक्त होईल अशी माहिती जमा केली असून तिचा फायदा सामान्य शेतकऱ्यासहि घेतां यावा या हृष्टीनें १९४०-४१ सालाकरितां सरकारनें योजना आखली आहे.

पावसामुळें शेतांतील माती धुपून गेल्यामुळें जमिनीचा कस उतरतो. कांहीं ठिकाणीं धुपून गेलेल्या जमिनींतून पीक काढणेंहि अशक्य होतें. महाराष्ट्रांत हा प्रश्न विशेष महत्त्वाचा आहे. शास्त्रीय पद्धतीनें बांध घालून, किंवा लहान धरणें बांधून हा प्रश्न सोडवितां येईल. अशा तऱ्हेच्या योजना तयार करण्याकरितां सरकारनें ५६ हजार रुपयांची रकम मंजूर केली आहे.

वरील योजना यशस्वी होण्यास शेतकऱ्यांचे व्यक्तिगत प्रयत्न पुरे पडणार नाहींत. शेतकऱ्यांचें परस्पर सहाय असल्याखेरीज हा प्रश्न यशस्वी रीतीनें सोडवितां येणार नाहीं.

गुजराथसारख्या प्रांतांत पाण्याचा प्रश्न महत्त्वाचा आहे. त्याकरितां भूगर्भांतील पाणी शोधून विहिरी बांधण्याकरितां प्रांतिक सरकारनें ८१ हजार रुपयांची व्यवस्था केली आहे.

विजापूर व सोलापूर जिल्ह्यांकरितां ड्राय फार्मिंगची योजना उपयुक्त ठरली असून त्याकरितां ४९ हजार रुपयांची रकम खर्च करण्याचें ठरलें आहे. किमान दहा-बारा खेड्यांनीं संघटित प्रयत्नानें करावयाची ही गोष्ट असल्यामुळें तिचें यश त्यांच्या संघटनेवर अवलंबून आहे. विजापूर जिल्ह्याच्या उत्तर भागांत या योजनेची सुरवात करण्यांत येणार आहे.

महाराष्ट्रांतील लोण्याच्या धंद्यांत सुधारणा होणें इष्ट आहे. टाटा हायड्रो-इलेक्ट्रिकच्या पाण्याचा कुलाबा व ठाणें जिल्ह्यांत लागवडीकरितां उपयोग करणें आवश्यक आहे. कोंकणांत कालव्याच्या पाण्यानें बारा महिने पीक काढण्याबाबत प्रयत्न होणें अगत्याचें आहे. तसेंच शेतीच्या जमिनींत हरळी उगवल्यामुळें पडीत झालेल्या जमिनी पुन्हां लागवडींत आणण्याचे प्रयत्न व्हावयास पाहिजेत. परंतु याबाबत मुंबई सरकारास तूर्त कांहीं करतां येत नाहीं.

## म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

टी. नरसीपूर येथील म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि. चा कारखाना भरभराटींत आहे. दरमहा ५०० पौंड रेशीम घेण्याचा एका ऑस्ट्रेलियन फर्मशीं करार ही कंपनी करीत आहे. आणखी रेशीम उरल्यास तें घेण्याचीहि त्या फर्मची तयारी आहे. टी. नरसीपूर ह्या गांवाची लोकसंख्या ३,५०० आहे, त्यांतील ८०० लोकांचें जीवित कमी-अधिक प्रमाणांत ह्या कारखान्यावर अवलंबून आहे. जपानी रेशमास मागें टाकून म्हैसुरी रेशीम नवीन बाजारपेठा काबीज करीत आहे. रेशमाचे किडे बाळगण्याचा धंदा करणाऱ्या शेतकऱ्यांसहि त्यांच्या कोष्यांस चांगली किंमत येऊं लागली आहे. एन. जी. नाईक आणि कंपनीकडे फिलेचर्सची मॅनेजिंग एजन्सी आहे आणि तिचे प्रमुख म्हैसूर चेंबरचे अध्यक्ष श्री. नारायणराव नाईक हे आहेत. प्रो. वा. गो. काळे हे कंपनीचे एक डायरेक्टर आहेत.

### हुंडा प्रतिबंधक कायदा

हुंडा देऊन अथवा घेऊन मुलाचा अगर मुलीचा विवाह केल्यास तो १ हजार रुपयांपर्यंत दंडास पात्र करणारें एक बिल त्रावणकोर संस्थानाच्या विधिमंडळांत श्रीमति नारायणी अम्मा ह्यांनीं गेल्या जानेवारींत मांडलें होतें, तें लोकांचें मत अजमावण्यासाठी प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. प्रेमाखातर लहान लहान बक्षिसें देणें-घेणें बेकायदा ठरविण्यांत येणार नाहीं, परंतु ह्या बक्षिसांची किंमत १ हजार रुपयांपेक्षा कमी असली पाहिजे.

### सहकारी बँकांच्या सभा

मध्यप्रांतांतील बंद पडलेल्या सहकारी बँकांच्या सभा तेथील रजिस्ट्रारनें बोलविल्या आहेत. बँकांजवळील रोख रकमा आणि इतर हातीं येण्याजोगे पैसे त्यांच्या ठेवीदारांस त्यांच्या ठेवींच्या प्रमाणांत वाटावेत आणि उरलेलें देणें देण्यासंबंधीं योजना आखावी, ही रजिस्ट्रारची सूचना त्या सभांतून विचारांत घेतली जाईल.

# स्फुट विचार

### सुशिक्षितांची बेकारी–बंगालमधील परिस्थिति

आधुनिक पद्धतीचें उच्च शिक्षण घेणाऱ्या वर्गांत हिंदुस्थानामध्यें बेकारी वाढत चालली आहे तिला आळा कसा घालावा ह्या विषयींची चर्चा आज अनेक वर्षे चालली असून त्यासंबंधांत कांहीं प्रयत्नहि होत आहेत. निरनिराळ्या प्रांतांत ह्या विषयाची खास चौकशी झाली असून तिच्या आधारानें उपाययोजनाहि सुचवण्यांत आली आहे. बंगालमध्यें सरकारास ह्या प्रश्नाचे बाबतींत सल्ला देण्यासाठी एका अधिकाऱ्याची खास नेमणूक करण्यांत आली आहे. निरनिराळया धंद्यांत शिकलेल्या तरुणांचें प्रमाण काय आहे आणि त्यांस त्यांमध्यें अधिक वाव कसा देतां येईल ह्याची माहिती गोळा करण्याचें काम गेल्या वर्षी ह्या अधिकाऱ्यास सांगण्यांत आलें होतें. बंगालमधील परिस्थिति विशिष्ट प्रकारची आहे आणि तिच्या संबंधांतली वरील अधिकाऱ्यानें दिलेली माहिती बोधकारक आहे. बंगाल प्रांतांतील धंद्यांत बंगाली सुशिक्षित तरुण फारच थोडे आहेत व जे आहेत ते कारकून व हलक्या दर्जाचे मजुतनीस आहेत असें चौकशींत आढळून आलें आहे. बंगालच्या कारखान्यांत त्या प्रांताबाहेरच्या लोकांचाच भरणा आहे आणि केवळ अशिक्षित बंगाल्यांस त्यांत काम मिळत आहे. तागाच्या गिरण्यांतील कामकऱ्यांपैकीं २४ टक्के आणि कागदाच्या गिरण्यांतील कामगारांपैकीं ३५ टक्के लोक बंगाली आहेत. काचेचे, बर्फाचे वगैरे कारखाने घेतले तर त्यांमध्यें हें प्रमाण त्याहूनहि कमी आहे. एकूण कारखाने हिशेबांत घेतले तर त्यांत सुमारें निम्मे लोक बंगाली आहेत आणि हे बहुतेक सर्व अशिक्षित आहेत. ह्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते कीं, स्वतःच्या प्रांतांतील उद्योगधंद्यांत शिकलेल्या बंगाली तरुणांनीं प्रवेश करून घेतलेला नाहीं. इतरत्र सुशिक्षित लोक स्वतः धंदे काढून ते चालवतात, तोच मार्ग बंगाली तरुणांनीं चोखाळला पाहिजे अशी वर निर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्याची सूचना आहे. कलकत्ता व ढाक्का येथील विश्वविद्यालयांतून दरवर्षी बाहेर पडणाऱ्या हजारो तरुणांस कारकुनी पेशाचें काम मिळणें अशक्य असल्यानें त्यांनीं हातांनीं करावयाच्या कुशल कारागिरीची व यांत्रिक व्यवहाराची कास धरली पाहिजे, तरच त्यांचा व राष्ट्राचा तरणोपाय आहे असें त्यांचें सांगणें आहे. त्यांनीं निरनिराळया धंद्यांची चौकशी केली, त्यांमध्यें आठ लक्ष कामगार आहेत. ह्याच्या अर्धा टक्का इतक्या लोकांची भरती दरवर्षी नव्यानें होते, असें मानलें तरी चार हजार लोकांस नवीन काम मिळण्याजोगें आहे. त्यांतल्या निम्म्या जागा शिकलेल्या लोकांच्या वांट्यास येण्यास अडचण नाहीं असा त्यांचा हिशेब आहे.

### बेकारीवर उपाय

डॉ. एन. दास ह्यांनीं स्टेट्समन पत्राच्या विशेषांकासाठीं लिहिलेल्या लेखांतून वरील माहिती घेतली आहे आणि बेकारीबाबतचे बंगाल सरकारचे ते सल्लागार असल्यानें त्यांच्या विचारासहि महत्त्व आहे. मुंबई प्रांतांतली परिस्थिति बंगालपेक्षा भिन्न असली तरी त्यांच्या कल्पना व सूचना इकडेहि उपयुक्त झाल्यावांचून रहाणार नाहींत. त्यांच्या मतें सुशिक्षितांच्या बेकारीचें पहिलें कारण उद्योगधंद्यांच्या गरजा आणि आमची शिक्षणपद्धति ह्यांचेमध्यें एकसूत्रतेचा अभाव हें आहे. धंद्यांमध्यें ज्या लायकीची माणसें लागतात, ती लायकी सध्याच्या शाळा-कॉलेजांतील शिक्षणानें तरुणांत उत्पन्न होऊं शकत नाहीं. यंत्रें चालवणारे कुशल कारागीर आणि उद्योगाचीं निरनिराळीं अंगें सांभाळणारे कामगार तयार करण्याची पात्रता ह्या शिक्षणांत नाहीं. आमच्या शाळा व कॉलेजें ह्यांच्यामधून कारकुनी व दुय्यम हपीसरी ह्यांसच केवळ लायक असे तरुण बाहेर पडतात आणि त्यांस मर्यादित मागणी असल्यानें बहुसंख्य सुशिक्षित लोक बेकार बनतात. एकीकडे बेकारांची वाढती गर्दी व दुसरीकडे कुशल व शिकलेले कामगार मिळण्याचीं कारखान्यांच्या मालकांस भासत असलेली अडचण अशी विचित्र विजोड परिस्थिति दिसून येत आहे. डॉ. दास ह्यांनीं सांगितलेलें दुसरें कारण सध्यांची समाज घटना हें आहे. जातिभेद हळुहळु कमी तीव्र होत असले तरी धंदे व जाती ह्यांचा संबंध अजूनहि निकट आहे. ह्या कारणानें विशिष्ट व्यवसायांसच लोकांस चिकटून रहावें लागतें आणि आपल्या आवडीच्या व लायकीच्या व्यवसायांत शिरतां येत नाहीं. आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थान देश मागसलेला असल्यामुळें होतकरू तरूणांसहि उद्योगाचे दरवाजे उघडे नाहींत. बेकारीच्या आपत्तीवर उपाय डॉ. दास ह्यांनीं सुचवले आहेत, ते असे. बौद्धिक उच्च शिक्षणाकडे जो आज ओढा सर्वत्र दिसून येतो, त्यास नियंत्रण घातलें पाहिजे आणि हस्तव्यवसाय, व्यापार, उद्योग ह्यांकडे तरुणांची प्रवृत्ति वळवणें आवश्यक आहे. पदव्यांच्या पाठलागांत तरुण लोक वर्षांच्या वर्षे घालवतात आणि अखेर त्यांच्या हातीं कांहींच लागत नाहीं. काळ व पैसा ह्यांची बचत करून पालकांनीं आपल्या मुलांत व्यापार व धंदे ह्यांची आवड उत्पन्न केली पाहिजे. कारखानदार व धंद्यांचे मालक शिकलेल्या लोकांकडे तुच्छतेनें पहातात आणि आपल्या दृष्टीनें हे तरूण कुचकामाचे आहेत असें समजतात. ही वृत्तीहि बदलली पाहिजे. पडेल तें काम हातांनीं करण्याची तयारी हिंदी तरुणांत पसरत चालली आहे आणि तिला उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. धंदेवाले आणि धंदेशिक्षण संस्था ह्यांचेमध्यें सहकार्य होऊन औद्योगिक शिक्षणपद्धतींत परिस्थितीस अनुरूप अशा सुधारणा घडवून आणल्या असतां बेकारीचा प्रश्न सुटण्यास पुष्कळ सहाय होईल ह्यांत शंका नाहीं. डॉ. दास ह्यांच्या मतें हिंदुस्थानांतील बेकारीचा प्रश्न बहुतांशीं सामाजिक व शैक्षणिक स्वरूपाचा आहे आणि ह्या मतांत पुष्कळ तथ्यांश आहे.

### दारूबंदीविषयीं हायकोर्टाचा निर्णय

मुंबई अबकारी ॲक्टाच्या १४ ब (२) ह्या कलमाखालीं चौघांवर खटले भरण्यांत आले होते, त्यांत ते दोषमुक्त ठरले होते. ह्या निवाड्यांवर सरकारतर्फे हायकोर्टाकडे अपील करण्यांत आलें, परंतु हायकोर्टानें खालील कोर्टांचा निवाडा कायम केला आणि अबकारी ॲक्टाच्या वरील कलमाप्रमाणें सरकारनें काढलेले जाहीरनामे बेकायदा ठरविले. मुंबई सरकारच्या दारूबंदीच्या कार्यक्रमास विधिमंडळाची संमति होती, तरी विधिमंडळाच्या कायद्याच्या स्वरूपांत सरकारास ती मिळाली नव्हती. १८७८ च्या अबकारी ॲक्टाच्या १४ ब (२) ह्या कलमाप्रमाणें सरकारनें दारूबंदी करण्यासाठी काढलेले जाहीरनामे सदरहु ॲक्टास धरून होते किंवा नाहीं, ह्या महत्त्वाच्या प्रश्नावर हायकोर्टास आपलें मत द्यावयाचें होतें. "अबकारी कायद्याचा मूळ हेतु सरकारास अबकारी उत्पन्न मिळविणें हा आहे आणि त्यास दारूच्या खरेदी–विक्रीवर

नियंत्रण ठेवतां यावें, ह्या दृष्टीनेंहि त्या कायद्यांत कांहीं कलमें समाविष्ट केलेलीं आहेत. तथापि सामाजिक सुधारणा घडवून आणण्यासाठी पूर्ण दारूबंदी करण्याकडे कायद्याचा उपयोग करतां येईल, असा अर्थ कायद्यांत कोठेंच निघत नाहीं आणि अबकारी ॲक्टाचा तसा उपयोग करणें कायद्याच्या उद्देशास धरून नाहीं" असें मत हायकोर्टानें व्यक्त केलें आहे. एकाद्या व्यक्तीस अगर कांहीं व्यक्तींच्या विशिष्ट गटास जवळ दारू बाळगण्यास अबकारी कायदा प्रतिबंध करूं शकेल, परंतु सर्वसाधारण जनतेस तो प्रतिबंध करूं शकणार नाहीं; ज्यास प्रतिबंध करावयाचा तो नांवानें अगर वर्णनानें निर्दिष्ट करतां आला पाहिजे; अबकारी कायद्यांतील दारूबंदीची तरतूद सर्व लोकांस लागू व्हावी अशी प्रांतिक विधिमंडळाची इच्छा असती, तर ती कायद्यामध्यें स्पष्टपणें नमूद केली गेली असती; असा खुलासा हायकोर्टानें आपल्या निवाड्यांत केला आहे. अबकारी कायद्यांतून व्यापक अर्थ काढण्याची सरकारास मुभा दिली तर कायद्यावर अवलंबून लोकांनीं मोठें भांडवल गुंतवून सुरू केलेले आणि वाढविलेले धंदे सरकार लेखणीच्या फटक्या-सरशी बंद करूं शकेल आणि ही सत्ता सरकारास मिळूं देणें हें अबकारी कायद्यास धरून होणार नाहीं, असा हायकोर्टाचा अभिप्राय पडला. मुंबई सरकारनें काँग्रेस प्रधान मंडळाच्या नेतृत्वाखालीं दारूबंदीस प्रारंभ केला त्यास लोकप्रतिनिधींचा आणि मतदारांचा पाठिंबा होता. परंतु, सरकारनें ज्या कायद्याच्या आधारानें दारूबंदी अंमलांत आणली, त्या कायद्याचा फाजील विस्तृत अर्थ त्यानें केला, असें हायकोर्टाचें म्हणणें आहे. वास्तविक, सरकारनें ह्या संबंधांत कायदेशीर सल्ला घेऊन शक्य ती खबरदारी घेतली होती आणि हायकोर्टानें ती दारूबंदी आतां बेकायदा ठरविली, तरी तो बेकायदेशीरपणा तात्काळ नाहींसा करण्यासाठी गव्हर्नरांनीं खास कायदा जाहीर केला. ही गोष्ट राज्यकारभार नीट चालण्याच्या दृष्टीनें अत्यंत उचित अशीच झाली. नाहीं तर, दारूबंदीच्या अंमलबजावणीचे संबंधांत गोंधळ उडून गेला असता. दारूबंदीची पूर्वस्थिति कायम राखण्यासाठी "गव्हर्नर्स ॲक्ट" करण्यांत आला असला, तरी दारूबंदीच्या धोरणांत वेळोवेळ जरूर वाटेल त्याप्रमाणें फरक करण्यास आपणांस मोकळीक असल्याचें गव्हर्नरांनीं स्पष्ट केलें आहे. ही मोकळीक कोणत्याहि सरकारास नेहमी असतेच. हायकोर्टाच्या निवाड्यामुळें निर्माण झालेल्या परिस्थितींत गव्हर्नरांनीं अविलंबिलेल्या धोरणाविषयीं पूर्वीच्या काँग्रेसपक्षीय प्रधानांनीं मन:पूर्वक समाधान व्यक्त करण्यांत औचित्य दाखविलें आहे. कांहीं वृत्तपत्रांनीं हायकोर्टाच्या निवाड्याचा अर्थ दारूबंदीचें धोरण अयोग्य ठरलें, असा केला. परंतु तसा अर्थ निवाड्यांतून निघत नाहीं. एका विशिष्ट अबकारी कायद्याच्या आधारानें दारूबंदी करतां येत नाहीं, ह्या पलीकडे हायकोर्टाच्या निवाड्याची व्याप्ति नाहीं. दारूबंदीचें धोरण योग्य कीं अयोग्य, ह्याच्याशीं त्याचा संबंध पोहोंचूं शकत नाहीं.

### जपानी कापडाची हिंदुस्थानांत आयात

जपानमधून हिंदुस्थानांत आयात होणाऱ्या कापडाचें नियंत्रण हिंद-जपान व्यापारी करारानें होतें. परंतु चीनमध्यें जपानी मालकीच्या अनेक गिरण्या आहेत त्यांत तयार होणारें कापड चिनी बनावटीचें म्हणून हिंदुस्थानांत दाखल होतें आणि अशा रीतीनें अप्रत्यक्ष रीतीनें हिंद-जपान व्यापारी कराराच्या अटी जपानकडून मोडल्या जातात, अशी तक्रार मुंबईच्या गिरणी-मालक संघानें हिंदुस्थान सरकारकडे केली आहे विशेषत: गेल्या तीन चार वर्षांत ही आयात फारच वाढली असून तिची स्पर्धा स्वदेशी कापडास जाणवूं लागली आहे असें गिरणीवाल्यांचें म्हणणें आहे. १९३९-४०च्या पहिल्या नऊ महिन्यांत ह्या मार्गानें १५ लक्ष वार कापड आलें आणि गेल्या एकट्या फेब्रुवारींतच त्याची आयात ९३ लक्ष वार झाली. जपानी मालकीच्या चिनी कापडाची आयात नियंत्रित करावी, अशी गिरणी-मालक संघाची मागणी आहे.


## धी बँक ऑफ इंडिया लि.

[ स्थापना—७ सप्टेंबर १९०६ ]

| | |
|---|---|
| उभारलेलें भांडवल ... ... ... | रु. २,००,००,००० |
| वसूल झालेलें भांडवल ... ... ... | रु. १,००,००,००० |
| रिझर्व्ह फंड ... ... ... | रु. १,१३,००,००० |

मुख्य कचेरी—ओरिएन्टल बिल्डिंग्ज, मुंबई.

शाखा—बुलियन एक्सचेंज ( शेख मेमन स्ट्रीट, मुंबई ), बांद्रे ( मुंबईनजीक ), मलबार हिल ( मुंबई ), कुलाबा ( मुंबई ), काळबादेवी, ( मुंबई ), अहमदाबाद, अहमदाबाद–स्टेशन शाखा, कलकत्ता, कलकत्ता-बडाबझार, चौरंगी स्केअर ब्रँच, पुणें, पुणें शहर, राजकोट, सुरत, नागपूर सिटी, नागपूर ( किंग्जवे ), जमशेदपूर

लंडन एजन्ट्स—धी वेस्टमिन्स्टर बँक लिमिटेड.

### चालू ठेवींवरील व्याजाचा दर

जानेवारी ते डिसेंबर अखेर दररोजच्या रु. ३०० ते रु. १,००,००० रकमेच्या चालू ठेवीवर शेकडा ½ टक्का व्याज दिलें जाईल, परंतु एक लाखावरील रकमेच्या चालू ठेवीवर स्पेशल व्याजाची आकारणी केली जाईल. सहामाही अखेर व्याजाची रक्कम ५ रु. इतकी असल्याशिवाय व्याज दिलें जाणार नाहीं. कायम थोडक्या मुदतीच्या व सेव्हिंग बँकेकडील ठेवी सुद्धां आम्ही ठेवून घेतों; व त्यांवर व्याजाची योग्य आकारणी करतों; विशेष माहिती व नियम वगैरे अर्जानें मागवावेत.

शिवाय, ट्रस्टी, या नात्यानें इतर जीं कामें करावयाचीं तीं करावीं लागल्यास तींसुद्धां ही बँक करते. नियमांची माहिती अर्जानें मागवावी. शिवाय, सर्व प्रकारचे बँकेचे व्यवहार या बँकेमार्फत केले जातात.

एजंट—टी. आर. लालवाणी.

## दि बँक ऑफ महाराष्ट्र लिमिटेड.

### लक्ष्मीरोड, पुणें शहर.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल...... | रु. १०,००,००० |
| विक्रीस काढलेलें भांडवल ... | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल...... | रु. ३,१२,००० |
| वसूल झालेलें भांडवल... | रु. १,५६,००० |

### शाखा

अेक्झॅमिनर प्रेस बिल्डिंग, दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

### डायरेक्टर्स

प्रो. व्ही. जी. काळे, चेअरमन, श्री. डी. के. साठे, व्हा. चेअरमन, श्री. एन. जी. पुवार, श्री. टी. व्ही. रावडे, श्री. व्ही. पी. वर्दे, श्री. एम. आर. जोशी, श्री. एस. जी. मराठे, श्री. आर. सी. सोहोनी, श्री. एफ. डी. पदमजी.

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात. सोन्यारूप्याच्या दागिन्यांवर कर्ज काढतां येतात.

बँकेचे नियम व व्याजाचे दर व शेअरबद्दल बँकेकडे चौकशी करावी.

एस. व्ही. बोरवणे, मॅनेजर.

## औंध स्टेट बँकिंग अँड इन्शुअरन्स कंपनी, लिमिटेड.

( वार्षिक सभा १४–४–४० )

### भांडवलांत वाढ

अहवालाचे सालीं कंपनीचें भरणा झालेलें भांडवल जें रु. १,१८,६४० होतें तें रु. १,२८,०५० झालें व सेळत्या भांडवलांत रुपये एक लाखाचे वर वाढ होऊन तें आतां सुमारें रु. ९,००,००० चें झालें आहे.

गुदस्त सालीं शेतीचा मोसम समाधानकारक झाला नाहीं. तसेंच संस्थानांतील बऱ्याच भागांत आवर्षण जाणवल्यामुळें त्याचा परिणाम थोडाबहुत वसुलावर झाला. सहकारी सोसायट्यांचा वसूल रु. ९७,६०२ आला व व्यक्तिशः कुळांचा वसूल रु. १२,२२७ झाला. त्याचप्रमाणें संस्थाननें हमी घेतलेल्या स्टेट कर्जाचा वसूल रु. ३२,१३३ झाला. आतां संस्थाननें हमी घेतलेल्या बँक कर्जाची रक्कम रु. १,७४,९२३ येणें आहे. अहवालाचे सालीं इतर प्रकारच्या कर्जाचे व्यवहारांत रुपये ७०,००० ची वाढ झाली. या कर्जात अहवालाचे सालीं रद्द झालेल्या सोसायट्यांचे कर्जाची रक्कम रु. ९,४९० येणें असलेली सामील आहे व त्याच वसुलीचें काम लिक्विडेटरकडून सुरु झालें आहे. खबरदारी घेण्याचे दृष्टीनें या कर्जाचें व्याज हिशेबांत घेतलेलें नाहीं. व्यक्तिशः कुळांकडील व सहकारी सोसायट्यांकडील कर्जाची थकबाकी रु. ६०,२९२ साल अखेरीस होती व त्याचें एकूण येण्याशीं प्रमाण ११ टक्के पडत आहे.

### नवीन इमारत व कोठार

बिचूद येथे कंपनीनें शासेकरतां एक ऑफिस व कोठार बांधणेचें काम अहवालाचे सालीं पुरें केलें. या कामास एकंदर खर्च रु. ५,५६७–११–० झाला. औंध येथें मुख्य ऑफिसकरतां इमारत बांधणेचें काम अहवालाचे सालीं सुरू करणेंत येऊन तें आतां पुरें झालें असून तेथें ऑफिस नेलें आहे. या कामीं झालेल्या खर्चाचा अद्याप जमाखर्च होणेचा आहे. म्हणून खर्च झालेली रक्कम किरकोळ या सदरीं जिंदगीचे बाजूस दाखविलेली आहे. कंपनीकडे संस्थानचे ट्रेझरीचें काम पूर्वीप्रमाणेंच आहे, मात्र सोसायट्यांचें ऑडिटचें काम तारीख १ जुलै १९३९ पासून संस्थाननें आपलेकडे घेतलें आहे. कंपनीच्या संस्थानांत सहा शाखा असून त्यांचें काम समाधानकारक रीतीनें चाललें आहे.

### विमाविभाग

तारीख ३१ डिसेंबर १९३९ इसवी रोजीं पुऱ्या होणाऱ्या सालांत कंपनीला फक्त सातच महिने काम करण्यास मिळाले आहेत. या अल्पावधींत कंपनीकडे २३४ विमा-अर्ज आले असून त्याखालील विम्याची रक्कम रु. २,०४,३५० आहे. या अर्जात ऑर्डिनरी व इंडस्ट्रियल अशा दोन्ही विम्यांचा समावेश झालेला आहे. वरील विमा-अर्जांपैकी १७२ अर्जांचें रूपांतर पॉलिसीज देण्यांत झालें व त्याखालील रक्कम रु. १,५०,५०० ची आहे. इतर विमा-अर्ज अपुरे, नाकारलेले व पुढें ढकलले गेलले असे आहेत. इंडस्ट्रियल विमाविभाग ता. ३० जून १९३९ पासून बंद करण्यांत येऊन त्या विभागाच्या पॉलिसीज देण्याचें बंद करण्यांत आलें आहे.

### लाइफ फंड

पुऱ्या झालेल्या कामाचें प्रिमियमचे वार्षिक उत्पन्न रु. ७,७७८–१४–० आहे. अहवालाचे सालीं यापैकीं रु. ६,२०१–१५–० जमा झाले आहेत. एजन्सी कमिशन, नोकर पगार, वैद्यकीय तपासणी फी वगैरे खर्च भागवून कंपनीस रु. १,१३३–१०–७ चा लाइफ फंड उभारतां आला. वरील गोष्टीवरून विमा-विभागाचा कारभार किती काटकसरीनें चालविला आहे हें दिसून येईल. परंतु केवळ काटकसरीसाठी जरूरीच्या बाबींकडे दुर्लक्ष करण्यांत आलेलें नाहीं.

### विमा-खात्याचा नफा हातीं येण्यास अवकाश

कंपनीनें विमा-विभागांत अजमासें रु. ५३,०००/– गुंतविले आहेत व औंध स्टेट प्रॉव्हिडंट इन्शुअरन्स कंपनीचे रु. १०,०००/–चे शेअर खरेदी केले आहेत व तिचे वाढीस मदत केली आहे. विमा-विभागाचा व प्रॉव्हिडंड कंपनीचा फायदा व्हॅल्युएशन झाल्यानंतरच दिसून येणारा असतो. यावरून जो नफा आतां झाला आहे तो बँकिंग खात्याचाच आहे हें दिसून येईल व वरील खात्यावर खर्च झाला असल्यानें या विभागाचें नेहमींचें नफ्याचें प्रमाण कमी झाल्याचें दिसून येईल यासाठी विमाविभागाचा व प्रॉव्हिडंड कंपनीचा पहिला व्हॅल्युएशन रिपोर्ट हातीं येईपर्यंत थांबल्यास नफ्याचें प्रमाण अनेक पटीनें गुणित होत असल्याचें दिसून येईल.

### नफा व त्याची वाटणी

तारीख ३१ डिसेंबर सन १९३९ इसवी अखेरचे सालास कंपनीस निव्वळ नफा रु. ६,४४५–१४–११ झाला व यांत मागील सालचे रु. ६२–९–० मिळविल्यावर एकंदर नफा रु. ६,५०८–७–११ होत आहे. त्याची विभागणी खालीलप्रमाणें करण्यांत आली.

| | | |
|---|---|---|
| १ एकूण नफ्याचे २०% रिझर्व फंडास | रु. | १,३०१– ०–१ |
| २ भागीदारांना डिव्हिडंड ४% प्रमाणें | रु. | ४,९३५–१२–० |
| ३ स्टेट लेव्ही | रु. | ५४– ५–७ |
| ४ धर्मादाय व स्टाफ बेनीफीट फंड | रु. | २०८–१२–० |
| ५ शिल्लक पुढील सालाकरतां | रु. | ८– ९–४ |
| एकूण | रु. | ६,५०८– ७–११ |

### ग्रेटब्रिटनमधील जर्मन लोक

ग्रेट ब्रिटनमध्यें आज सुमारें ७४,००० जर्मन आणि ऑस्ट्रियन लोक आहेत, त्यांपैकी ६५ हजारांवर कोणत्याहि प्रकारचें विशेष बंधन नाहीं. फ्रेंच अगर अमेरिकन लोकांस ग्रेट ब्रिटनमध्यें जे नियम पाळावे लागतात, त्या पलीकडे त्यांस अधिक कांहीं करावें लागत नाहीं. उरलेल्या ९ हजारांपैकी फक्त सुमारें ५७० लोक बंदिवासांत आहेत. बाकीच्यांस त्यांच्या रहाण्याच्या ठिकाणांपासून पांच मैलांपर्यंत कोठेहि परवानगी न घेतां जातां येतें. कॅमेऱ्यासारख्या वस्तू त्यांनीं बाळगतां कामा नयेत. बाकीच्या लोकांत मिसळण्यास त्यांना प्रत्यवाय नाहीं. बंदिवासांत ठेवलेल्या लोकांची संख्या पुष्कळ मोठी झाली असती, परंतु हजारो शत्रुपक्षीय लोक ३ सप्टेंबरच्या आंत जर्मनीकडे परतले. जे बंदिस्त ठेवले जाण्याचा संभव अधिक, असेच लोक त्यांत मुख्यतः होते.

## आळशीची लागवड

हिंदुस्थानांत एकूण ३० लक्ष, २६ हजार एकरांत आळशीचें पीक असून त्याची लागवड मुख्यतः मध्यप्रांत आणि वऱ्हाड, संयुक्त प्रांत आणि बिहार ह्यांमध्यें आहे. खालील तक्त्यांत ह्या लागवडीची तपशीलवार माहिती दिली आहे:—

### आळशीच्या पिकाची प्रांतवार वाटणी

| प्रांत व संस्थान | १९३९–४० (एकर) |
|---|---|
| मध्यप्रांत आणि वऱ्हाड | १,३४८,००० |
| संयुक्त प्रांत | २८२,००० |
| बिहार | ५६१,००० |
| मुंबई | १२०,००० |
| बंगाल | १५७,००० |
| पंजाब | ३०,००० |
| ओरिसा | ८,००० |
| हैद्राबाद | ३८८,००० |
| कोटा | ७२,००० |
| भोपाळ | ६०,००० |
| एकूण | ३,०२६,००० |

वरील आकड्यांवरून आळशीच्या पिकाची शतमानानें प्रांतवार खालीलप्रमाणें लागवड झालेली दिसून येईल:—

| प्रांत व संस्थान | लागवडीचें प्रमाण % |
|---|---|
| मध्यप्रांत आणि वऱ्हाड | ३२·७ |
| संयुक्त प्रांत | २३·२ |
| बिहार | १५·४ |
| मुंबई | ३·४ |
| बंगाल | ३·३ |
| पंजाब | ०·८ |
| ओरिसा | ०·२ |
| हैद्राबाद | ११·२ |
| कोठा | २·६ |
| भोपाळ | १·३ |

अमेरिका, कॅनडा, अर्जेंटिना, हे आळशीची लागवड करणारे प्रमुख देश आहेत. त्यांचेमधील लागवडीचे आकडे येथें दिले आहेत:—

| देश | लागवड (एकर) |
|---|---|
| अमेरिका | २२,८४,००० |
| कॅनडा | २,०७,००० |
| अर्जेंटिना | ७६,००,००० |

### श्रीगजानन वीव्हिंग मिल्सची दिनदर्शिका

सांगली येथील श्रीगजानन वीव्हिंग मिल्सची शके १८६२ ची दिनदर्शिका आमचेकडे आली आहे. ह्या दिनदर्शिकेंत मराठी तारखेत आणि आकड्यांत देशी आणि इंग्रजी तारखांची सर्व माहिती देण्यांत आली आहे. जुन्या पंचांगाप्रमाणें फरक आणि सार्वजनिक सुट्या हीं प्रत्येक पानासाठी स्वतंत्र लिहिलेलीं आहेत. स्मरणासाठीं लिहावयाच्या मजकुरासाठी प्रत्येक दिवसास एक ओळ राखून ठेवलेली आहे. श्री. विष्णुपंत वेलणकर ह्यांनीं १९११ सालीं श्रीगजानन मिल्सची स्थापना केली. आतां त्या कारखान्यास स्पिनिंगचें खातें जोडलें गेलें आहे. लवकरच स्वदेशी सुताची, स्वदेशी यंत्रावरील पातळें निर्माण होऊं लागतील.


स्पृहणीय यश
बोनसचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक–दर हजारीं बोनस | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी. मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

रूरल प्रॉडक्टस् कं. लि. चे
★ संत्रा ड्रिंक ★ जांभळाचा रस
★ जांभळाच्या बियाची पूड ★ इतर रस व पेयें
सर्व मोठ्या व महत्त्वाच्या ठिकाणीं विकण्यासाठीं जबाबदार प्रतिनिधि पाहिजेत.
रजिस्टर्ड ऑफिस: ७५४ शुक्रवार, पुणें २ | बिझिनेस ऑफिस: ११२A सदाशिव, पुणें २
न. गं. आपटे, बी. एजी., एम्. एस्सी.

S. B. JOSHI & Co.
ENGINEERS & CONTRACTORS
Examiner Press Building, Dalal Street, Bombay | 716 Sadashiv Peth, Poona City

K. K. & Co.
Photographic Dealers
POONA.

'अर्थ' ग्रन्थमाला.
१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली

### हाडांचा उपयोग

ब्रिटिश लष्कराचा अन्नखर्च अतिशय मोठा आहे, तो कमी करण्यासाठीं वाया जाणारे जिन्नस विकून त्याचे पैसे करण्यांत येतात. बराकींतून टाकून दिलेल्या हाडांची किंमतच सालिना १½ कोटि रुपये भरते, असें म्हणतात. युद्धकाळांत अर्थातच, हा आकडा ह्यापेक्षां मोठा होईल, हें उघड आहे. कार्बन बायसल्फाइडमध्यें हाडें खूप तापवलीं, म्हणजे त्यांतून उपयुक्त चरबी निघते, त्यापासून ग्लिसरीन तयार करतात. ग्लिसरीनचा उपयोग दारूगोळा करण्याकडे होतो. चरबी निघाल्यावर कोळसा रहातो, त्याचा उपयोग साखर स्वच्छ करण्यासाठीं आणि चांदीचा मुलामा करण्यासाठीं होतो. हाडांतून निघणारें जिलेटीन रेशीम, कागद, इत्यादींचे उत्पादनांत सहायकारक होतें आणि दारू गाळण्यांतहि तें उपयोगी होतें. साबण, मेणबत्त्या, ह्यांचे कारखानदारांस हाडांचा पुष्कळ उपयोग होतो आणि त्यांच्या राखेपासून बशा, वगैरे होऊं शकतात. ब्रिटिश सैनिकांचें जेवण संपल्यावर त्यानें टाकून दिलेलीं हाडें पुनः त्यास निराळया स्वरूपांत कामास येतात. जेवणाचे वेळीं लागणाऱ्या कपबशा, तोंड धुण्याचा साबण, कॅमेऱ्यांतील फिल्म, लेखणीची दांडी, मेणबत्ती, इत्यादि हजारो गोष्टी त्यांपासून होतात.

### मि. मॉंटेग्यू नॉर्मन

लंडन हें शहर सर्वद जगाच्या आर्थिक व्यवहारांचें केंद्र आहे आणि त्यांतल्या त्यांत थ्रेडनीडल स्ट्रीटवरील समोरासमोरील बँक ऑफ इंग्लंड आणि रॉयल एक्सचेंज ह्या संस्थांच्या व्यवहारांचें महत्त्व विशेष आहे. बँक ऑफ इंग्लंडच्या नेतृत्वावर व्यापारी बँका आणि पैशाशीं संबंध असणाऱ्या इतर संस्था ह्यांचें भवितव्य अवलंबून असतें. मि. मॉंटेग्यू नॉर्मन हे ह्या बँकेचे प्रमुख (गव्हर्नर) आहेत. सहाजीकच, त्यांची सत्ता ग्रेट ब्रिटनमध्यें मुख्य प्रधानांचे खालोखाल आहे. बँक ऑफ इंग्लंडच्या गव्हर्नराच्या महत्त्वाची बरोबरी राइट ऑनरेबल रेजिनॉल्ड मॅकेन्ना ह्यांच्या महत्त्वाची आहे. पूर्वी ते फडनवीस होते. प्रमुख जॉइंट स्टॉक बँकांचें प्रभुत्व त्यांचेकडे आहे आणि त्यांस दरमहा २० हजार रुपये पगार मिळतो.

### फक्त रविवारीं कारागृहवास

फ्लॉरिडामध्यें वहातुकीबाबत ज्यांस शिक्षा झाली, अशा लोकांस फक्त रविवारींच कारागृहवास भोगण्यास सवलत देण्यांत येते. त्यामुळें बाकीच्या दिवशीं त्यांस आपला पोटापाण्याचा उद्योग करतां येतो.




एजंटः—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्निमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यांस
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.
PARADKAR TAILORING ACADEMY POONA

महायुद्धाची जाणीव! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर
महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी
बुधवार चौक, पुणें

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं
असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी—सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २०००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## पूर्व खानदेश
## सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

जळगांव.

( स्थापना : मे १९१६ ) रु.

| | |
|---|---|
| अधिकृत शेअर भांडवल. ...... | १०,००,०००।— |
| जमा झालेलें शेअर भांडवल...... | ४,६९,०००।— |
| रिझर्व्ह फंड. ...... | २,९८,०००।— |
| इतर फंडस. ...... | ३,७७,०००।— |
| खेळतें भांडवल (३०-६-३९) ...... | ५७,८९,०००।— |

डिव्हिडंड पांच टक्के ( सहा वर्षांपासून )

हेड ऑफिस :—सेंट्रल को-आपरेटिव्ह बँक बिल्डिंग,
नवी पेठ, जळगांव.

पूर्व खानदेश जिल्ह्यांतील सर्व भागांत शाखा व पे-ऑफिसेस चांगल्या रीतीनें चालू आहेत.

—: बँकर्स :—

मुंबई : मुंबई प्रॉव्हिन्शिअल को-आपरेटिव्ह बँक लि. मुंबई.
जळगांव : इंपीरिअल बँक ऑफ इंडिया.
अहमदाबाद : बँक ऑफ इंडिया लि.
नागपूर : सी. पी. अँड बेरार प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लि. नागपूर.

बँकेचे हिशेब त्रैमासिक रजिस्टर्ड अकौंटंटचे फर्मकडून व वार्षिक सरकारी स्पेशल ऑडिटराकडून तपासले जातात.

चालू ठेवीवर : अर्धा टक्का व्याज दिलें जातें.
सेव्हिंग्ज ठेवीवर : दोन टक्के व्याज देण्यांत येतें.
मुदतीच्या ठेवीवर : तीन ते साडे चार टक्के व्याज मुदतीप्रमाणें देण्यांत येतें.

ठेवीदाराचे व्यवहार सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत केले जातात. बँकेशीं व्यवहार करणारांचे सोयीप्रमाणें बँकर्स मार्फत योजना करण्यांत येते.

सर्व प्रकारच्या मुदतीच्या ठेवी स्वीकारण्यांत येतात. सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार केला जातो. ठेवीवरील व्याजाचे दर अगर व्यवहाराच्या अटी समक्ष अगर पत्रद्वारें कळविण्यांत येतील.

को-ऑपरेटिव्ह संस्थांना मुदतीच्या ठेवीवर इतरांपेक्षा अर्धा टक्का व्याज जास्त देण्यांत येतें.

वी. डी. देशमुख,
चेअरमन.



## बँका आणि त्यांचे व्यवहार

दुसरी ताजी आवृत्ति प्रसिद्ध झाली.

किं. १ रु. ८ आणे

१ रु. १० आ. चे पो. तिकिटें पाठवून मागणी करा.

: लेखक :

प्रो. बा. मो. काळे ◆ श्री. श्री. बा. काळे

बँकिंगविषयक प्रश्नांचें विवेचन करणारें अत्यंत उपयुक्त पुस्तक

" अर्थ " ग्रन्थमाला, : : पुणें ४.

## निवडक बाजारभाव

| | |
|---|---|
| बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) | ३% |

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ५% कपमाफ लोन ( १९४५–५५ ) ... ... | ११३–१० |
| ५% ( १९४०–४३ ) लोन ... ... ... | १०१–८ |
| ४% १९४३ ... ... ... ... | १०६–० |
| ३½% बिनमुदत ... ... ... ... | ९३–१४ |
| ३½% १९४७–५० ... ... ... | १०३–१४ |
| ३% ( १९६३–६५ ) ... ... ... | ९४–८ |
| २¾% १९४८–५२ ... ... ... | ९७–४ |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) ... | १०५–० |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) ... ... | १०४–८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१–६३ ) ... ... | ११०–१२ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) ... ... | १२१–० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसांतील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो. )

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००–५० ) ११% ... ... | १४०–० |
| बँक ऑफ बडोदा ( १००–५० ) १०% ... ... | १०१–८ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०–२५ ) ४% ... | ३६–१२ |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% ... ... | १५१२–० |
| पश्चिम प्रॉ. को. बँक ( ५० ) ४% ... ... | ५३–० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% ... ... | १०५–० |

#### वीज

| | |
|---|---|
| बॉंबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% ... ... | ११२–८ |
| कराची ( १०० ) ९% ... ... ... | १५१–४ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% ... ... | १८२–८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% ... ... | १३४७–८ |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% ... ... | १५२५–० |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड–बारामती ( १०० ) ४½% ... ... | ९५–८ |
| पाचोरा–जामनेर ( १०० ) २% ... ... | ६४–० |
| अहमदाबाद प्रांतिज ( ५०० ) १२½% | ९८०–० |
| तापी व्हॅली ( ५०० ) ७½% ... ... ... | ७६०–० |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. ... ... ... | ११९–८ |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००–५० ) २ रु. ... ... | ४७–० |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. ... ... ... | २१–८ |
| न्यू इंडिया विमा ( ७५–१५ ) १ रु. ... | १८–१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. ... | ४३७५–० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% ... ... | २०८–१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( २०० ) १५ रु. २ आ. ... | १४७–० |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. ... ... | ३९६–० |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै ... | २१७७–८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु ... ... | १२३–४ |

#### सोनें–चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास ... ... | ४२–७–६ |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस ... ... | ५७–१५–० |

## गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म, पिंपळें

गिलिगन कॅटल ब्रीडिंग फार्म पिंपळे, ह्या संस्थेस श्री. भास्करराव जाधव ह्यांनीं ता ३-३-४० रोजीं भेट दिली. त्यावेळीं त्यांनीं आपला खालील अभिप्राय नमूद केला.

"आज रोजीं या फार्मवर येऊन एकंदर स्थिति पाहिली. जनावरांची स्थिति फार चांगली आहे. नेमाडी जातीच्या जनावरांची सुधारणा या फार्मावर होत आहे ही गोष्ट खानदेशासच नव्हे तर मुंबई इलाख्यास भूषणावह आहे. ध्येय नेहमीं उच्च दर्जाचें असावें व सतत त्या ध्येयावर नजर ठेवून प्रयत्नांत कसूर होऊं देऊं नये. दिल्ली येथील अखिल भारतीय पशु–प्रदर्शनांत सतत तीन वर्षें नेमाडी जातीच्या जनावरांना ठेवलेल्या बक्षिसांपैकीं वरच्या दर्जाचीं बक्षिसें या संस्थेनें पटकावलीं आहेत यावरून कोणासहि या संस्थेच्या यशाची कल्पना येईल.

"गाई-बैलांची निपज सुधारण्याकडे संस्थेचें जसें लक्ष आहे तसेंच तें कोंबड्यांची औलाद सुधारण्याकडेहि आहे. गरीब शेतकऱ्यांच्या झोपडींतील कोंबडी जास्त अंडीं घालणारी झाल्यास शेतकरी वर्गाचा फायदाच आहे.

"शेळीला गरिबांची गाय म्हणतात. गाई म्हशीचें दूध शेतकऱ्यांच्या मुलांच्या तोंडांत पडत नाहीं; तें सुखवस्तू लोकांस विकलें जातें. प्रत्येक शेतकऱ्यानें एक शेळी बाळगल्यास त्यांच्या मुलास थोड्या खर्चांत दूध मिळेल."

## २० वर्षांनंतरचा राष्ट्रसंघ

राष्ट्रसंघ अस्तित्वांत येऊन गेल्या महिन्यांत २० वर्षें पुरीं झालीं. या २० वर्षांच्या कालावधींत जग अतिशय झपाट्यानें बदललेलें असून बदललेल्या परिस्थितीनुसार राष्ट्रसंघानें आपली उपयुक्तता विविध क्षेत्रांत वाढवली आहे. राजकीय क्षेत्रांत हा प्रयत्न अयशस्वी झाल्यासारखा वाटत असला तरी सारचा प्रश्न, आलंड बेटांचा तंटा, ग्रीस व बल्गेरियाचें टाळलेलें युद्ध वगैरे गोष्टींकडे दुर्लक्ष करून चालणार नाहीं. बहुजन समाजाच्या अपेक्षा राष्ट्रसंघानें या क्षेत्रांत पुऱ्या केल्या नसल्या तरी याचा दोष या संस्थेपेक्षां मनुष्यस्वभावाकडेच अधिक जातो. आलेल्या अपयशानें धीर न सोडता अनुभवाचे बळावर जास्त ज्ञान मिळवून कार्यक्षम होण्याचा त्याचा विचार आहे.

आर्थिक, सामाजिक, आरोग्यविषयक, बौद्धिक व वाङ्मयीन क्षेत्रांत राष्ट्रसंघानें इतकें व्यापक व विविध प्रकारचें कार्य बजावलें आहे कीं, त्याची बरोबरी करणारी एकही संस्था आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत सांपडणार नाहीं. सर्व राष्ट्रांतील अधिकृत आंकडेवार माहिती गोळा करणें, आहार, रहाणीचा दर्जा, खेडेगांवांतील आरोग्य, वेश्याव्यवसाय, अफू व मादक द्रव्यांच्या व्यसनाला आळा घालणें, मुलांचें महत्त्व, शैक्षणिक चित्रपट, दळणवळण, बौद्धिक सहकार्य वगैरे शेंकडो उपयुक्त विषयांचें संशोधन करण्यांत आलें चीन आफ्रिका, हंगेरी, स्पेन व इतर अनेक मागासलेल्या राष्ट्रांना मदत केली. सारांश, आंतरराष्ट्रीय सहकार्याचा एकही मार्ग राष्ट्रसंघानें सोडला नाहीं. यापुढें जोंवर राजकीय दृष्ट्या प्रगती करतां येत नाहीं तोंवर याच क्षेत्रांत अधिक उपयुक्त कार्यक्रम राष्ट्रसंघानें आंखला आहे.

# CONFIDENCE

is a worth-while asset in business building. The success that has attained Hindusthan's efforts to serve the public has its origin in public confidence, its,

**YEARS OF**

Efficient Management, Fair Dealings, Prompt Settlement of Claims, Liberal Terms, Enterprize, Judicious Reserves, Sound Investments, Huge Assets and Useful Service

HAS CREATED

**PUBLIC CONFIDENCE**

The following figures will convince you:

**NEW BUSINESS**

Last year 1937-38

Exceeds

Rs. 3 CRORES

**BONUS**

PER THOUSAND PER YEAR

On Endowment Rs. 23 | On Whole Life Rs. 20

# HINDUSTHAN

## Co-operative Insurance Society, Ltd.

( ESTD. 1907 )

*Branches :* Bombay, Madras, Delhi, Patna, Lahore, Lucknow, Dacca.

*Office :* throughout India & the East.

S. C. MAJUMDAR,
MANAGER : Bombay Branch.

POONA OFFICE — 180, Budhwar Peth

## N. V. WADNERKAR

Gold & Silver Smith, Jeweller & Engraver, Electro-plater & Manufacturer of Sporting Trophies, Medals, Cups etc.

Raviwar Peth, Saraff Bazar,

POONA CITY.

# अर्थशास्त्र

लेखक—प्रो. वा. गो. काळे व प्रो. द. गो. कर्वे

पृष्ठसंख्या सुमारें ४००, किंमत ३ रुपये

या ग्रंथांत अर्थशास्त्राच्या सर्वसामान्य सिद्धांतांचें विवेचन केलें आहे.

फर्म, कंपनी, सोसायटी

# कायदा

लेखक : श्री. के. बा. गजेंद्रगडकर, वकील, बी. ए. ( ऑनर्स ), एलएल. बी.

"न्यायबोध" या कायद्याच्या मासिकांतून क्रमशः प्रसिद्ध झालेली लेखमाला आतां पुस्तकरूपानें तयार झाली. फर्म, कंपनी, सोसायटी यांच्या कायद्यासंबंधीं विवेचन या पुस्तकांत केलेलें आहे. हें विवेचन मुंबई इलाख्यांतील कायद्याला अनुसरून असल्यामुळें हें पुस्तक संग्रहीं ठेवणें अवश्य आहे. ट.ख. सह किंमत ८६ आण्यांचीं तिकिटें पाठवा.

मॅनेजर : सेंट्रल लॉ हाउस,
तुळशीबागरोड : : नागपूर शहर

# विमा—जगत्

विमाविषयक प्रश्नांची सांगोपांग चर्चा करणारें मराठींतील एकमेव मासिक.

जानेवारी १९४० पासून ३ ऱ्या वर्षास सुरुवात. केव्हांहि वर्गणीदार होतां येतें.

वार्षिक वर्गणी फक्त २ रुपये

दर महिन्याच्या १५ तारखेस प्रसिद्ध होतें.

व्यवस्थापक—विमा—जगत्, पुणें २.




## स्त्रियांचा आजार

म्हणजे मुख्यतः विटाळदोष व गर्भाशयांत बिघाड होणें होय. आमचें औषध आर्डोमिक्स ( आर्तवदोषारि ) एका निष्णात स्त्रीरोग-चिकित्सकाचे सल्ल्यावरून तयार केलेलें असून आज सतत १० वर्षांच्या अनुभवानें स्त्रियांच्या सर्व प्रकारच्या गुप्त रोगांवर अप्रतिम गुणदायक ठरलेलें आहे. धुपणी, विटाळ नसणें, थोडा अथवा कष्टदायक होणें, ओटी पोटांत कळा मारणें, ज्वर, कडकी, अकालीं गर्भपात, होणें, दुखणें, शौचास साफ न होणें, इत्यादि, विटाळदोष नाहींसे करून गर्भाशय निरोगी करण्याचा इलाज फक्त या आर्डोमिक्समध्ये असल्यामुळें वैद्य व डॉक्टर मोठ्या प्रमाणावर वापरीत आहेत.

किंमत बाटलीस ३ रुपये, टपालखर्च १२ आणे. एकदम ३ बाटल्या मागविणारांस टपालखर्चासह फक्त ९ रुपये.

धी इंडो फॉरिन एजन्सीज ( डि. के. १ )
२५३।१ माधवविलास, टिळकवाडी, पुणें २.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्री. द. वामन काळे, बी. ए., यांनीं ' दुर्गाधिवास, ' भांबुर्डा, घ. नं. १२७।१ अ, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.